प्रभात
◆ पुणे, शनिवार दि. १० एप्रिल २०१०

# रुग्णांवरील उपचाराची माहिती आता एका 'क्लिक'वर

पिंपरी, दि. ९ (प्रतिनिधी) - डॉक्टर-रुग्ण, डॉक्टर-परिचारिका, डॉक्टर-औषध विक्रेता यांच्यातील संवाद सुलभ व्हावा यासाठी देशपातळीवर प्रयत्न केले जात आहेत. उपचारांबाबत रुग्ण अधिक जागरूक झाला आहे. रुग्णालयात उपचार कशा पद्धतीचे मिळतील याची तो माहिती घेऊ लागला आहे. त्यामुळे भारतीय उद्योग क्षेत्रात आरोग्य, न्याय वैद्यक आणि त्याच्या कागदपत्रांची देखभाल याचे महत्त्व वाढले असून त्यादृष्टीने पावले उचलली जात असल्याची माहिती आदित्य बिर्ला रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. एस. पी. सिंग यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आदित्य बिर्ला रुग्णालयात हेल्थ रेकॉर्ड असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या वतीने 'मेडरेकॉन १०' ही दहावी राष्ट्रीय वार्षिक परिषद आयोजित करण्यात आली आहे. न्याय वैद्यकीय व्यवस्थापन हा या परिषदेचा विषय आहे. या संदर्भात माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. सिंग बोलत होते. यावेळी हेल्थ रेकॉर्ड असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सी. गोविंदराजन उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. सिंग पुढे म्हणाले, २० वर्षांपूर्वी उपचाराबाबत रुग्णांमध्ये जागरुकता नव्हती. आता रुग्ण रुग्णालयात उपचार कसे मिळतील, कशा प्रकारचे मिळतील याविषयी प्रश्न विचारू लागला आहे. रुग्णांच्या उपचाराबाबतची माहिती अद्ययावत ठेवण्याची केंद्र सरकारची सूचना आहे. त्यादृष्टीने सर्वच रुग्णालये उपाययोजना करीत आहेत.

वैद्यक क्षेत्रातील या अडचणी दूर करण्यासाठी डॉक्टर, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील लोकांना एकत्र आणून यासंदर्भात चर्चा करण्यात येत आहे. या चर्चासत्रात देशातील अडीचशेपेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. आदित्य बिर्ला रुग्णालयात संगणकाच्या माध्यमातून रुग्णांच्या माहितीचे संकलन कशा पद्धतीने केले जात आहे याची माहिती त्यांनी दिली. चर्चासत्राचे उद्‌घाटन महापौर योगेश बहल आणि मेजर जनरल पनवार यांच्या हस्ते झाले.




हेल्थ रेकॉर्ड असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या वतीने आदित्य बिर्ला रुग्णालयात आयोजित 'मेडरेकॉन १०' या राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन महापौर योगेश बहल यांनी दीपप्रज्वलित करून केले. समवेत सी. गाविंदराजन, डॉ. एस. पी. सिंग, मेजर जनरल पनवार व इतर.